# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष- / डिपॉझिट (ठेव)/परिपत्रक/ 7700/२०१५ दिनांक 04/09/२०१५

प्रति,

१. जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सर्व

२. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी
तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सर्व

**विषय :- उमेदवारांची ठेव (डिपॉझिट) रक्कम परत अथवा जप्त करणेबाबत...**

**संदर्भ :- या प्राधिकरणाकडील पत्र जा.क्र. रासनिप्रा/कक्ष-२/मुंबई/डिपॉझिट (ठेव)/ परिपत्रक/ ४७२४/१५ दिनांक २६/०५/२०१५**

उपरोक्त संदर्भीय परिपत्रकाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२/- राज्यातील निवडणूकीस पात्र सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया बहुतांशी पूर्ण होत आलेली आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम २३ नुसार संस्थेचे निवडणूक प्रक्रिये दरम्यान उमेदवारास डिपॉझिटपोटी विहीत केलेली रक्कम संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. निवडणूकीत भाग घेतलेल्या नामनिर्देशीत व्यक्तीने आपले नामनिर्देशन पत्र मुदतीत मागे घेतल्यास निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सदरची डिपॉझिटची रक्कम संबंधित उमेदवारास नामनिर्देशनपत्र मागे घेतल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत परत करणे अनिवार्य आहे.

याबाबत या प्राधिकरणाकडील संदर्भीय परिपत्रकान्वये स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि अद्यापि निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेल्या संस्थांच्या बाबतीत वरीलप्रमाणे उमेदवारांच्या अनामत रकमा परत केल्यागेल्या नसल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आलेले आहे. सबब प्रक्रिया पूर्ण झालेल्या संस्थांच्या उमेदवारांच्या अनामत ठेव रकमा रेखांकीत धनादेशाद्वारे संबंधितांना तात्काळ परत करण्यात याव्यात.सदर कृती ३०/०९/२०१५ पूर्वी पूर्ण करण्याचे निर्देशित करण्यात येत आहे.

तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम ७० नुसार डिपॉझिट रक्कम जप्त झाल्यास सदर रक्कम राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या विविक्षित खात्यावर जमा करणेबाबतही संदर्भीय परिपत्रकान्वये आदेशित करण्यात आलेले आहे. राज्य निवडणूक पूर्ण झालेल्या एकूण संस्थांची संख्या विचारात घेता अनामत रक्कम जप्त झालेबाबतही अद्यापि प्राधिकरणाचे खात्यावर सदरील रकमा जमा करण्यात आलेल्या नाहीत असेही निदर्शनास आलेले आहे. सदरबाबत संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांना आदेशित करण्यात येते की, जप्त करण्यात आलेल्या अनामत ठेवीची रक्कम तात्काळ **राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, निवडणूक निधी (बँकेचे नाव- स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा- पुणे मुख्य,**

**खाते क्र. ३४९४४७०३३३८)** या नावाने धनाकर्षाद्वारे ( DD)/बँकर्स चेकद्वारे प्राधिकरणास समक्ष सादर करावी. सदर कृती ३०/०९/२०१५ पूर्वी पूर्ण करण्याचे निर्देशित करण्यात येत आहे.

वरील प्रमाणे अनामत ठेव रकमा परत/जप्त करण्याप्रकरणी संस्था निहाय यादी प्राधिकरणास सोबत जोडलेल्या नमून्यात ज्या संस्थांची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली आहे त्या सर्व संस्थांची दिनांक ३०/०९/२०१५ पूर्वी प्राधिकरणास सादर करावी (नमूना मागे आहे)

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशाने**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

## महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ चे नियम २३ व नियम ७० नुसार उमेदवार डिपॉझिट रकमांचा अहवाल

| अ.क्र. | संस्थेचे नाव | उमेदवार डिपॉझिट रक्कम जमा | अनु. क्र ३ पैकी उमेदवारास परत करावयाची रक्कम | अनु. क्र. ३ पैकी जप्त करावयाची रक्कम | अनु. क्र. ४ पैकी उमेदवारास परत केलेली रक्कम | अनु. क्र. ४ पैकी निवडणूक निर्णय अधिका-याकडे शिल्लक रक्कम | अनु. क्र. ५ पैकी प्राधिकरणास वर्ग केलेली रक्कम | अनु. क्र. ५ पैकी निवडणूक निर्णय अधिका-याकडे शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |